# छ. शाहू महाराजानी दुष्काळ निर्मुलनासाठी केलेल्या योजना

**डॉ. बबन भिवसेन जाधव** मार्गदर्शक शिक्षणमहर्षी दादासाहेब लियमे कॉलेज कळंबोली, ता. पनवेल
**रणजित रंगराव पाटील** संशोधक विद्यार्थी शिक्षणमहर्षी दादासाहेब लियमे कॉलेज कळंबोली, ता. पनवेल

**प्रस्तावना :–**

आजच्या प्रगत काळातील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेतीच आहे. शाहू महाराजांच्या काळात तर कोल्हापूर संस्थानाचा शेती हा मुख्य व्यवसाय होता. पुरेशा सिंचन सुविधांचा अभाव, अज्ञान संस्थानात सतत पडणाऱ्या दुष्काळासारख्या नैसर्गिक समस्या यामुळे शेतकऱ्यांची अवस्था कमालीची दयनीय झाली होती. शाहू महाराजांनी इ.स. 1902 च्या दरम्यान युरोपचा दौरा केला. नैसर्गिक साधन संपत्तीचा युरोपात होत असलेला काटेकोर वापराने महाराज प्रभावित झाले. वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर कायमची मात करण्याचा विचाराने इ.स.1902 मध्ये आपल्या संस्थानात महाराजांनी अपूर्व असे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. संस्थानात स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती केली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये छ. शाहू महाराजांनी दुष्काळ निर्मुलसाठी केलेल्या ज्या ज्या योजना होत्या त्यापैकी पाटबंधारे खात्याची योजना या विषयावर शोध निबंधामध्ये सविस्तर विवेचन केले आहे.

**कोल्हापूर राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग :–**

कोल्हापूर राज्याचे पोलिटिकल एजंट कर्नल अंडरसन यांच्या काळापासून कोल्हापूर राज्याचा चेहरा मोहरा बदलण्यास प्रारंभ झाला. सन 1866 ते 1874 या काळात त्यांनी कोल्हापूर राज्याचे पोलिटिकल एजंट म्हणून कार्य केले. त्यांच्या काळात प्रशासनात सार्वजनिक बांधकाम विभाग सुरू झाला. त्यामुळे अनेक सरकारी वास्तु आणि रस्ते यांची उभारणी झाली. नवीन राजवाडा, रेल्वे मार्ग उभारणे शक्य झाले. त्यासाठी कोणतीही रक्कम कर्जाने घेतली नाही. सन 1879 मध्ये राज्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागकरीता स्वतंत्र अशा एक्झीक्युटिव्ह इंजिनिअरची नियुक्ती केली या पदावर आर. जे. शनॉन यांची नियुक्ती केली. त्यांनी शाहू महाराजांच्या काळातही सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणून कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर–मिरज रेल्वेमार्ग पूर्ण झाला. तसेच त्यांनी कोल्हापूर राज्यात अनेक ठिकाणी तलाव बांधण्यात पुढाकार घेतला.

**पाटबंधारे योजनेची आवश्यकता :–**

शाहू महाराजांनी संस्थानाची सुत्रे हाती घेतल्यानंतर त्यांना पाहिल्या सहा वर्षाच्या काळातच भीषण अशा दोन (1896–97, 1899–1900) दुष्काळांना तोंड द्यावे लागले. त्यासाठी सुमारे सहा लाख रूपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च झाली होती. राज्याच्या उत्पन्नाच्या तुलनेत हा खर्च प्रचंड असा म्हणता येईल.[1] परंतु त्यांनी आर्थिक बाबींचा फारसा विचार न करता दुष्काळासाठी आवश्यक तेवढा पैसा खर्च केला. दुष्काळाबरोबरच त्यांना प्लेग साथीचा बंदोबस्त करावा लागला.[2] दुष्काळनिर्मुलनासाठी पाण्याची आवश्यकता होती. कारण पाण्याशिवाय शेतीचे उत्पन्न घेणे कठीण होते. पावसाचे प्रमाण कमी अधीक असल्याने शेतऱ्यांना खात्रीचे उत्पन्न मिळणे शक्य नव्हते. दुष्काळ प्रतिबंध करण्यास पाटबंधाऱ्याच्या कामाचा (इरिगेशन) फार उपयोग होतो. त्यासाठी पाटबंधारे योजना हाती घेणे आवश्यक होते. त्यासाठी महाराजांनी पाटबंधारे खात्याच्या निर्मितीसाठी जाहिरनामा प्रसिध्द केला.[3]

**इरिगेशन ऑफिसरची नेमणूक :–**

सन 1902 मध्ये पाटबंधारेबाबत प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्यात पुढील बाबींचा समावेश केला.[4]; Mass Irrigation Policy) दुष्काळाचा प्रतिबंध करण्यास पाटबंधाऱ्याच्या कामाचा इरिगेशन फार उपयोग होतो. असे नजरेस आल्यावरून मोठ–मोठ्या तळ्यांची कामे सुरू करण्यात आली आहेत. या तळ्यांचा व संस्थानातील इतर तळ्यांचा व विहिरींचा इरिगेशनच्या कामी जास्त उपयोग व्हावा, या हेतूने पब्लीक वर्क्स खात्यात इरिगेशन डिव्हीजन निराळी करण्यात येऊन त्यांजवर मि. शंकर सिताराम गुप्ते यास इरिगेशन ऑफिसर नेमण्यात आले होते.

''संस्थानात इरिगेशन तलाव कोठे आहेत, त्यास पाण्याचा पुरवठा कोठून होतो, वर्षभर प्रत्येक तिमाही किती पाणी येते, किती पाण्याचा उपयोग करता येईल, तलाव बांधून पाणी आल्यास गाळ कोणत्या जातीचा येईल, त्यापासून शेतीस फायदा अगर गैरफायदा होईल वगैरे गोष्टीबद्दल खुलासेवार माहिती देण्याची आहे'' असा उल्लेख या काळातील इरिगेशन ऑफिसरच्या बाबतीत येतो.

**जाहिरनाम्यातील महत्वाच्या तरतुदी :–**

23 जानेवारी, 1902 रोजी जाहिरनामा प्रसिध्द केल्यानंतर त्याबाबतचे सरकारी पत्रक 3 फेब्रुवारी, 1902 रोजी प्रसिध्द केले त्यामध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला.[5]

1. सार्वजनिक बांधकाम विभागात स्वतंत्र असा पाटबंधारे विभाग सुरू करण्यात आला आहे.
2. श्री. शंकर सिताराम गुप्ते यांची पाटबंधारे अधिकारी (Irrigation officer ) म्हणून नियुक्ती केली आहे.
3. पाटबंधारे अधिकाऱ्यास आदेश दिला असून त्यांनी राज्याचा पाटबंधारे अहवाल तपशिलवार तयार करावा. प्रत्येक खेड्यास भेट देऊन त्या ठिकाणची माहिती प्राप्त करावी, यामध्ये खेड्यात असलेल्या प्रचलित पाटबंधारे बाबतची माहिती द्यावी.

4. पाटबंधारे अधिकाऱ्याने अलिकडे तयार झालेल्या तलावाच्या बाबत सविस्तर माहिती द्यावी. त्याच्या आधारे सरकारला किती महसुल मिळू शकतो याचा तपशिल द्यावा.

**पाटबंधारे खात्यातील नवीन नोकरवर्ग :–**

पाटबंधारेबाबतचा अहवाल तयार करण्यासाठी स्वतंत्र असा नोकरवर्ग नियुक्त केला होता.[6] 1 ड्रॉप्समन (पगार 20 रू.), 1 मेस्त्री (पगार 15 रू.), 1 कारकून (पगार 12 रू.), आणि अहवाल तयार करण्यासाठी 600 रू. चा स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला होता. याबाबत राज्याचे इंजिनिअर रावसाहेब विचारे यांचे मार्गदर्शन घेण्याबद्दल आदेशात नमूद केले होते. तसेच लवकरात लवकर अहवाल देण्याबद्दल सुचित केले होते.

कोल्हापूर संस्थानातील शेतीस पाणीपुरवठा करण्याबाबतचा सविस्तर अहवाल लवकर तयार करण्यात आला. या विभागाने प्रत्येक गावास भेट देवून तलाव, विहिरी, पाण्याचे झरे इत्यांदीची सविस्तर माहिती प्राप्त केली. शेती हा महत्वाचा आर्थिक भाग असल्याने महाराजांनी प्रारंभापासूनच शेतीच्या विकासासाठी प्रयत्न केले. शेतीच्या प्रगतीवरच राज्याची समृध्दी अवलंबून राहणार असल्याने त्यांनी स्वतंत्र असे पाटबंधारे खाते निर्माण केले आणि त्या विभागासाठी डें या शब्दाचा उपयोग केला. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाटबंधारे खात्याची जबाबदारी होती. परंतु महाराजांनी पाटबंधारे खात्याची स्वतंत्र निर्मिती करून शेतीस नियमित पाणी पुरवठा कसा होईल, याबाबत मुलगामी स्वरूपाचा विचार केला.

**निष्कर्ष :–**

कोल्हापूर संस्थानामध्ये राजर्षी छ. शाहूमहाराजांनी पाटबंधारे खात्याची योजना प्रभाविपणे राबवून संस्थानाला दुष्काळापासुन संरक्षित केले. त्याचबरोबर संस्थानातील शेती बारमाही ओलीताखाली आणली गेली. शेतीच्या विकासातून आज कोल्हापूर जिल्हामध्ये खाजगी आणि सहकारी क्षेत्रातील अनेक छोटे–मोठे उद्योग निर्माण झाले आहेत. त्यामुळे कोल्हापूर जिल्हात अनेक रोजगार निर्माण झाले आहेत. वरिल शोधनिबंधातून सरदचे निष्कर्ष पाहावयास मिळतात.

**संदर्भ :–**

1. लठ्ठे आ. बा. –श्री. छत्रपती शाहुमहाराज यांचे चरित्र, 1925 पृ. 121
2. कित्ता–पृ. 134
3- AdmisnistrReport
4. डॉ. पवार जयसिंगराव भाऊसाहेब–राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहिरनामे व हुकुमनामे पृ. 31
5- Report 1907&1908 P.43
6- Ibid.